# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com

जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार , दि. १ एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १४० किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

* एप्रिल फूल दिवस.

१५७८ : रक्ताभिसरणाचा महत्वाचा शोध लावणारा वैद्यकशास्त्राचा इंग्लिश संशोधक विल्यम हार्वे यांचा जन्मदिन.

१८८२ : पोस्टखात्याची बचत सेवा योजना सुरु झाली.

१९३३ : भारतीय विमानदलाची स्थापना.

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७१,९४७.५५ –१,६३५.६७ (२.२२%) |
| डॉलर | ₹ ९४.६५ |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | २३ |
| दिल्ली | ३१ | २१ |
| मुंबई | ३४ | २५ |
| नागपूर | ३८ | २३ |
| पुणे | ३८ | १८ |

# देशात आजपासून जनगणनेला सुरुवात

## वैयक्तिक माहिती राहणार गुप्त तर 'लिव्ह इन'चे जोडपे विवाहितांच्या येणार यादीत

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**जनगणनेचा पहिला टप्पा या बुधवारी म्हणजेच १ एप्रिलपासून सुरू होणार आहे. हा टप्पा एप्रिलमध्येच पूर्ण होणे अपेक्षित आहे. केंद्र सरकारकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, लोकसंख्या जनगणना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रक्रियेच्या दुसऱ्या टप्प्यात जात जनगणना केली जाणार आहे.**

रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी पत्रकार परिषदेत, राष्ट्रीय जनगणनेच्या दुहेरी रचनेबद्दल सविस्तर माहिती दिली. पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि गणना, घरांची स्थिती, उपलब्ध सुविधा आणि कौटुंबिक मालमत्ता यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. तर ही माहिती दुसऱ्या टप्प्यासाठी पाया तयार करणार असल्याचे म्हटले आहे.






**पहिल्या टप्प्याचे असे आहे वेळापत्रक**

जनगणना १ एप्रिल रोजी स्व-गणनेने सुरू होईल. त्यानंतर १६ एप्रिलपासून नियुक्त गणकांद्वारे घरोघरी जाऊन लोकसंख्या गणना मोहीम राबवली जाईल. पहिला टप्पा एप्रिल ते सप्टेंबर २०२६ दरम्यान पूर्ण होणे अपेक्षित आहे. २०२७ च्या जनगणनेत ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश, ७८४ जिल्हे, ५,१२७ वैधानिक (पान २ वर)

### लिव्ह-इनमध्ये राहणारे विवाहित जोडपे मानणार

जर लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणारे दोघे परस्परांना कायमस्वरूपी आपले मानत असतील तर जनगणनेदरम्यान त्यांना विवाहित जोडपे म्हणून गणले जावे का? भारतातील जनगणनेसाठीच्या स्वयं-गणना पोर्टलवरील वारंवार विचारल्या जाणाऱ्या (एफएक्यू) प्रश्नांतील हा एक प्रश्न आहे. लोकसंख्या-जनगणना, घरनोंदणी आणि गृहगणनेच्या पहिल्या टप्प्यात रहिवाशांना विचारले जाणारे ३३ प्रश्न अधिसूचित करून ही यादी १६ व्या जनगणनेदरम्यान स्वयं-गणना पर्याय निवडणाऱ्यांसाठी पोर्टलवर टाकली आहे. या प्रश्नांची उत्तरे लोकांना सहजपणे देण्यासाठी पोर्टलवर एफएक्यूंची यादी प्रसिद्ध केली जाते.

### बंगालमध्ये अधिसूचना जारी नाही

पश्चिम बंगाल सरकारने अद्याप जनगणनेची अधिसूचना का प्रसिद्ध केली नाही, असे विचारले असता ते म्हणाले, पश्चिम बंगालने जनगणनेची अधिसूचना प्रसिद्ध केलेली नाही. आम्ही हा मुद्दा त्यांच्यासमोर मांडला आहे. आम्हाला आशा आहे की राज्य सरकार अधिसूचना प्रसिद्ध करेल, जी एक कायदेशीर आवश्यकता आहे. पहिल्या टप्प्यासाठी आमच्याकडे सप्टेंबर २०२६ पर्यंत वेळ आहे.

### सुविचार

आपल्या स्वप्नांना पंख द्या आणि त्यांना उडू द्या; कारण फक्त उडालेल्या स्वप्नांनाच जगात उंच उड्डाणे घेता येतात.

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:२२ | संध्या-६:४२ |

### सोने – चांदी

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५१,०५५/- | २,४५,०००/- |

## थोडक्यात



### सिलिंडरअभावी मुंबईत परप्रांतीयांची उपासमार

**मुंबई ।** पश्चिम आशियातील परिस्थिती दिवसेंदिवस चिघळते आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणविरोधात पुकारलेले युद्ध संपण्याचे चिन्हे नाहीत. परिणामी जगभरातील पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवरही निर्बंध आल्याने देशात येणारा एलपीजीचा पुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे देशातील नागरिकांना एलपीजी गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवतोय. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत देशभरातील कामगार रोजीरोटीसाठी येतात. मात्र, आता जेवणाचीच भ्रांत निर्माण झाल्याने त्यांनी पुन्हा एकदा गावचा मार्ग निवडला आहे. शांतपणे पण व्यावहारिक विचार करून परतीकडे निघाले आहेत.

### राज्यात अवकाळीचा 'धडाका

**मुंबई ।** राज्यात अवकाळी पावसाने पुन्हा जोर धरला असून पुढील पाच दिवस हवामान धोकादायक राहण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुणे, नाशिक, धुळे, जळगावसह मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांमध्ये वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस कोसळत आहे. या अचानक बदललेल्या हवामानामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. हवामान विभागाचे पुणे येथील प्रमुख सुदीप कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात पुढील पाच दिवस दुपारनंतर वादळी पावसाचा जोर कायम राहणार आहे. काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट, तर काही ठिकाणी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## वैभव सूर्यवंशीने १५ चेंडूत अर्ध शतक झळकावले

वृत्तसंस्था । मुंबई

**राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२६च्या पहिल्याच सामन्यात चेन्नई सुपर किंग्सचा पराभव केला. फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही विभागांत राजस्थानची कामगिरी दमदार ठरली.**

या सामन्यातील आकर्षण ठरला तो १५ वर्षीय युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी. डावखुऱ्या सलामीवीराने शानदार अर्धशतक झळकावत संघाला ८ विकेट्स



आणि ४७ चेंडू राखून विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. याशिवाय राजस्थान रॉयल्सच्या गोलंदाजांनी पहिल्या डावात उत्कृष्ट गोलंदाजी करत चेन्नईला १२७ (पान २ वर)

## पुणे विद्यापीठाचा अर्थसंकल्प जाहीर!

वृत्तसंस्था । पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा २०२६-२७चा अर्थसंकल्प ८३ कोटींच्या तुटीसह सादर करण्यात आला. विद्यापीठासमोर आर्थिक आव्हाने उभी ठाकली असली, तरी संशोधनावर अर्थसंकल्पात विशेष भर दिला आहे. विद्यापीठाच्या अधिसभेत डॉ. नितीन घोरपडे यांनी हा अर्थसंकल्प मांडला. यामध्ये अपेक्षित उत्पन्न ६१९ कोटी ३४ लाख रुपये इतके आहे. मात्र, वेलफेअर व अन्य निधीसाठी ७८ कोटी आणि इतर ६२४ कोटी असा एकूण ७०२ कोटींचा खर्च अपेक्षित धरला आहे.

## नाशिक जिल्हा परिषदेचा उपविभागीय अभियंता ३ लाखांची लाच स्वीकारताना रंगेहात अटकेत

वृत्तसंस्था । नाशिक

**रस्ता दुरुस्ती व डांबरीकरणाच्या कामाचे देयक मंजूर करण्यासाठी पाच लाख ६७ हजार रुपयांची लाच मागून, त्यातील तीन लाख रुपयांची लाच स्वीकारताना जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील उपविभागीय अभियंत्याला रंगेहात पकडण्यात आले. दरम्यान, या प्रकरणातील शाखा अभियंता फरार झाला आहे.**

अलीकडेच सिमेंट बंधारा



दुरुस्तीचे देयक मंजूर करण्यासाठी जिल्हा परिषदेतील लघु पाटबंधारे विभागाच्या महिला कार्यकारी अभियंत्याला लाच स्वीकारताना पकडण्यात आले होते. पाठोपाठ घडलेल्या या घटनेमुळे नाशिक जिल्हा परिषदेच्या कारभारातील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील (चांदवड) उपविभागीय अभियंता (वर्ग-१) विठ्ठल बालाजी पठाडे (वय ५६) आणि शाखा अभियंता (वर्ग-२) कृष्णकांत जिभाऊ देवरे (वय २८) अशी संशयितांची नावे आहेत. तक्रारदाराची जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात ठेकेदार म्हणून नोंदणी आहे. या संस्थेमार्फत त्यांनी चांदवड तालुक्यातील बच्छाव वस्ती, उसवाड, कळमदरे, डोंगरगाव, निकम वस्ती ते रामा-२४ या रस्त्याच्या सुधारणा व डांबरीकरणाचे ९० (पान २ वर)

## पाकिस्तानात अज्ञात हल्लेखोरांनी उडवली गॅस पाईपलाईन


### महत्त्वाच्या ५ जिल्ह्यांचा पुरवठा झाला खंडित

वृत्तसंस्था । इस्लामाबाद

**पाकिस्तान सध्या एका गंभीर ऊर्जा संकटाशी झुंजत आहे. एलपीजीच्या तुटवड्यामुळे लोक आधीच त्रस्त होते, पण आता एक नवीन समस्येची भर पडली आहे.**

क्वेटाजवळ, बलुचिस्तानमधील एका प्रमुख गॅस पाइपलाइनवर अज्ञात हल्लेखोरांकडून बॉम्ब हल्ला झाला. अज्ञात हल्लेखोरांनी १८-इंची मुख्य पाइपलाइनला लक्ष्य करत देशातील गॅस पुरवठा खंडित केला असल्याचे सांगण्यात येत आहे.

गॅस पाइपलाइनच्या फुटल्यामुळे क्वेटा आणि आसपासच्या अनेक जिल्ह्यांचा गॅस पुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला. अनेकजण याला एक कट म्हणत असून गॅस पाइपलाइनमध्ये शस्त्र म्हणून कोणी वापर केला असेल असा सवाल उपस्थित होतोय. काल क्वेटाबाहेरील अख्तरबाद (पान २ वर)



### ➢ एलपीजीच्या पार्श्वभूमीवर एक मोठे षड्यंत्र ?

मध्यपूर्वेतील सुरू असलेल्या युद्धामुळे पाकिस्तान आधीच एलएनजी आणि एलपीजीच्या तुटवड्याचा सामना करत होता. कतार आणि संयुक्त अरब अमिरातीकडून होणाऱ्या पुरवठ्यावरही परिणाम झाला आहे. देशांतर्गत गॅस पाइपलाइनवरील हल्ल्यामुळे अडचणी आणखी वाढत आहेत. हिवाळ्यात गॅस पुरवठा बंद असल्याने लोकांना स्वयंपाक करताना गंभीर अडचणी येत आहेत.

## कॅनडात भारतीय वंशाच्या तरुणाची गोळ्या झाडून हत्या

वृत्तसंस्था । ओटावा

कॅनडातील सरे शहरात शनिवारी रात्री एका भारतीय वंशाच्या २७ वर्षीय तरुणाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे.

पोलिसांच्या मते हा एक लक्ष्यित हल्ला होता आणि याचा संबंध संघटित गुन्हेगारीशी असण्याची शक्यता आहे.

इंटिग्रेटेड होमिसाइड इन्व्हेस्टिगेशन पथकाने सोमवारी दिलेल्या माहितीनुसार, पीडिताची ओळख जसमान सेखोन म्हणून पटली आहे.

## अशोक खरात प्रकरणामुळे २ मंत्र्यांची खुर्ची धोक्यात

### मंत्रिमंडळातील 'भाकरी' फिरणार?

वृत्तसंस्था । मुंबई



**राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली असून, मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पक्षातील दोन बड्या मंत्र्यांवर नाराज असल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे.**

नाशिकमधील अशोक खरात प्रकरणामुळे सत्ताधारी पक्षाला मोठा फटका बसल्याचे मानले जात आहे. या प्रकरणात अनेक राजकीय नेत्यांची नावे समोर आल्याने विरोधक आक्रमक झाले आहेत. विशेषतः आमदार दीपक केसरकर यांच्यावरही आरोप होत असल्याने राजकीय दबाव वाढला आहे.

● सूत्रांच्या माहितीनुसार, नुकत्याच झालेल्या २०२६ च्या जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये अपेक्षित यश न मिळाल्यामुळेही नाराजी वाढली आहे. काही जिल्ह्यांत पक्षाची घसरलेली ताकद लक्षात घेता शिंदे हे मंत्रिमंडळात बदल करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.

**शिवसेना (ठाकरे गट) नेत्या सुषमा अंधारे यांनीही सोशल मीडियावर टीका करत पुढचा नंबर कोणाचा, असा सवाल उपस्थित केला आहे. तसेच, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावरही आरोप केले आहेत. मात्र गोऱ्हे यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर राज्यात मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होण्याची शक्यता निर्माण झाली असून, पुढील काही दिवसांत याबाबत ठोस निर्णय होण्याची शक्यता आहे.**

● खरात प्रकरणामुळे आधीच रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदासह पक्षातील पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. त्यांची चौकशीही होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विरोधकांनी या प्रकरणावरून सत्ताधाऱ्यांना घेरण्यास सुरुवात केली असून, संबंधित मंत्री आणि नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## माजी खा.उन्मेश पाटलांची धाराशिव मतदारसंघाच्या संपर्क प्रमुखपदी नियुक्ती

### शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने मिळाली मोठी जबाबदारी

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते तथा माजी खासदार उन्मेश पाटील यांनी तीन आठवड्यांपूर्वीच शिंदे गटात प्रवेश केला होता. त्यानंतर लगेचच त्यांच्याकडे मोठी जबाबदारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सोपवण्यात आली आहे. यामुळे पाटील यांचे शिवसेना शिंदे गटातील महत्व अल्पावधीतच वाढल्याचे अधोरेखित झाले असून, राजकीय वर्तुळातून आश्चर्य व्यक्त होत आहे.**

२०२४ मधील लोकसभा निवडणुकीत दुसऱ्यांदा उमेदवारी मिळाली नाही म्हणून उन्मेश पाटील यांनी भाजपला सोडचिठ्ठी देऊन शिवसेना ठाकरे गटात




प्रवेश केला होता. यासोबत आपले जीवलग मित्र करण पवार यांना त्यांनी ठाकरे गटाकडून लोकसभेची उमेदवारी देखील मिळवून दिली होती. प्रत्यक्ष निवडणुकीत मात्र पवारांचा पराभव झाला.

त्यानंतर स्वतः माजी खासदार पाटील यांनी विधानसभेच्या निवडणुकीत चाळीसगावमधून निवडणूक लढली. परंतु, भाजप आमदार मंगेश चव्हाण यांनी त्यांचा पराभव केला. मधल्या काळात बच्चू कडू यांना बरोबर घेऊन जळगावमध्ये शेतीप्रश्नी केलेल्या आंदोलनाव्यतिरिक्त माजी खासदार पाटील ठाकरे गटाच्या व्यासपीठावर फार चमकले नाहीत. ठाकरे गटापासून अंतर राखून असतानाच अखेर त्यांनी मार्च महिन्याच्या सुरुवातीला शिवसेना ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देऊन शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. (पान २ वर)

### ➢ आ.किशोर पाटील यांच्याकडेही जबाबदारी

माजी खासदार उन्मेश पाटील यांच्यासोबत पाचोऱ्याचे आमदार किशोर पाटील यांच्या खांद्यावरही शिवसेना शिंदे गटाने अमरावती लोकसभा मतदारसंघाच्या संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी टाकली आहे. विशेष म्हणजे भाजपमधून शिंदे गटात काही महिन्यांपूर्वीच दाखल झालेले अमळनेरचे माजी आमदार शिरीष चौधरी यांच्याकडेही नंदुरबारचे संपर्क प्रमुखपद सोपविले गेले आहे.

## संपादकीय

### भविष्यात इंधन दरवाढ अटळ!

पश्चिम आशियात सुरू झालेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर आज देशापुढे अनेक प्रकारची संकटे उभी राहिली आहेत. त्यामुळे सामान्य जनतेला मोठे चटके सहन करावे लागत आहेत. गॅसटंचाईमुळे सामान्य जनता हैराण तर झाली आहेच, पण या सगळ्या परिस्थितीचा देशातील लघुउद्योग क्षेत्र, उत्पादन क्षेत्र आणि निर्यात क्षेत्रावरही विपरीत परिणाम होऊ लागल्याने लोकांच्या रोजगाराच्या संधीही हिरावल्या जात आहेत. अनेक राज्यांमध्ये कमर्शियल गॅसच्या पुरवठ्यात जो खंड निर्माण झाला. त्यामुळे अनेक लघुउद्योग, बेकरी व्यवसाय, हॉटेल आणि खानावळी यांच्यावर विपरीत परिणाम झाला. या क्षेत्रात रोजंदारी करणारे हजारो मजूर त्यामुळे बाधित झाले. पंतप्रधान म्हणतात त्याप्रमाणे अनेक ठिकाणी करोना काळासारखी स्थिती निर्माण झाली असून उद्योग व्यवसाय बंद झाल्याने गावाकडे परतणाऱ्या कामगारांची संख्या वाढू लागली आहे. सामान्य कुटुंबे वाढत्या महागाईमुळे मेटाकुटीला आली आहेत. याच युद्धाचा परिणाम म्हणून खताची टंचाईसुद्धा देशात अनेक ठिकाणी निर्माण झाली असून शेतकऱ्यांना खतासाठी रांगा लावाव्या लागत आहेत. ही सगळी परिस्थिती सर्वसामान्यांसाठी हैराण करणारी ठरली असून या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने व्यवसायांना आणि परिस्थितीमुळे पोळलेल्या कुटुंबाला मदत करण्यासाठी काही विशेष आर्थिक पॅकेज देण्याची तयारी दर्शवली आहे. पश्चिम आशियातील संकट अधिक चिघळल्यावर ही मदत योजना लागू करण्याचा केंद्र सरकारचा विचार असल्याची माहिती संबंधित सूत्रांकडून देण्यात आली आहे. या पॅकेजमध्ये महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याबरोबरच संवेदनशील क्षेत्रांचे संरक्षण करण्यासाठी काही आर्थिक सूट देण्याचाही केंद्र सरकारचा विचार आहे, अशी माहिती केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही अनंत नागेश्वरन यांनी नुकतीच दिली आहे. त्यांनी दिलेली ही माहिती सध्या केवळ ऐकीव स्वरूपात वाटत असली तरी दिलासाजनक आहे. प्रश्न असा आहे की, केंद्र सरकार भविष्यात हे जे विशेष पॅकेज देणार आहे त्यातून सामान्य नागरिकांना नेमका किती लाभ होईल हे पाहावे लागेल. केंद्र सरकारने करोना काळातही भल्या मोठ्या आकड्यांची पॅकेजेस जाहीर केली होती पण त्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत फारच थोड्या प्रमाणात पोहोचला होता. आता जे पॅकेज जाहीर होणार आहे त्याची गत अशी होता कामा नये याची काळजी केंद्र सरकारला घ्यावी लागेल. अडचणीत आलेल्या देशवासीयांना मदत करणे ही केंद्र सरकारची प्राथमिक जबाबदारीच असते. त्यासाठी केंद्र सरकारने आपला हात ढिला सोडून योग्य ती मदत जनतेपर्यंत पोहोचवली पाहिजे. शेवटी सरकार ही व्यवस्था जनतेचे जगणे सुलभ करणे यासाठीच अस्तित्वात आहे याचा विसर सरकारला पडता कामा नये. केंद्र सरकारने अलीकडेच पेट्रोल आणि डिझेल वरील उत्पादन शुल्कात कपात केली. सामान्य लोकांना ऐकताना ही बातमी छान वाटली, पण सामान्य जनता जेव्हा पेट्रोल पंपावर इंधन भरायला गेली. त्यावेळी मात्र इंधनाच्या सध्याच्या दरात एक रुपयाचीही कपात झालेली त्यांना आढळली नाही. त्यामुळे केंद्र सरकारने उत्पादन शुल्कात जी कपात केली त्याचा लाभ जनतेला होण्याऐवजी तेल कंपन्यांनाच झाला हे लक्षात घेतले पाहिजे. आज आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर १०० डॉलर्सच्या वर गेले आहेत. त्यामुळे भविष्यात इंधन दरवाढ अटळ आहे. सध्या पाच राज्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुरू असल्याने सरकारने इंधनाचे दर वाढवलेले नाहीत, पण निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही स्थिती अशीच राहील याची हमी कोणीही देऊ शकत नाही. संकटाचा मुकाबला करताना जनतेने सहकार्य करावे, अशी जी अपेक्षा सरकार सातत्याने व्यक्त करताना दिसते आहे, ती इंधन दरवाढीसाठी पार्श्वभूमी तयार करण्याचा प्रकार आहे काय हे पाहावे लागेल.

# महापालिकेच्या स्थायी समितीत नव्या चेहऱ्यांना संधी

## महिला व बालकल्याण समिती, स्वीकृत सदस्यांची निवड

प्रतिनिधी । धुळे

**महापालिकेच्या स्थायी समितीत भाजपाने चेहऱ्यांना संधी दिली आहे. स्थायी समितीत निवड झालेले भाजपाच्या ११ सदस्यांपैकी तब्बल आठ चेहरे नवीन आहेत. तर राष्ट्रवादी-शिवसेना शहर विकास आघाडीच्या तीन व एमआयएमच्या दोन अशा एकूण १६ सदस्यांची स्थायी समितीवर वर्णी लागली आहे. शिवाय महिला व बालकल्याण समितीच्या एकूण ११ सदस्यांसह सात स्वीकृत नगरसेवकांची निवड महासभेत करण्यात आली.**



महापालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात सोमवारी सकाळी ११ वाजता महापौर मावादेवी परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली पहिली महासभा घेण्यात आली. सभेला उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, आयुक्त नितीन कापडणीस, नगरसचिव मनोज वाघ आदी उपस्थित होते. केवळ माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर अनुपस्थित होत्या. त्यांनी सभागृहाला तसे कळविले होते. महापालिकेची निवडणूक होवून आता अडीच महिने झाले. निवडणुकीनंतर आरक्षणाच्या कारणामुळे महापौर निवडीला बिलंब झाला होता. परिणामी, विषय समिती निवडीचा कार्यक्रमही लांबला होता. त्यातच गेल्या तीन दिवसांपूर्वी २७ मार्च रोजी राजकीय पक्षांच्या गटनेत्यांच्या शिफारशीनुसार एकूण सात जणांनी स्वीकृत सदस्य पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल केले होते. स्वीकृत नगरसेवकपदी नियमाप्रमाणे विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची नियुक्ती व्हावी, असे सांगत ॲड. मयूर बैसाणे यांनी वैयक्तिक नामनिर्देशपत्र दाखल केले होते. शिवाय आणखी अन्य दोघांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले होते. परंतु, या तिन्ही अर्जासोबत गटनेत्याचे शिफारसपत्र नसल्याने त्यांचे अर्ज नामंजूर करण्यात आले. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना डावलत स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आल्याने याविरोधात आपण उच्च न्यायालयात धाव घेणार असल्याचा इशारा ॲड. मयूर बैसाणे यांनी दिला. महासभेत भाजपाचे ओमप्रकाश गोपालकृष्ण खंडेलवाल, गुलशन उदासी, नरेश रुपला चौधरी, जयेश प्रविण वावदे, ऋषिकेश भिकन वराडे, एमआयएमचे अन्सारी मो. जावीद मो. शाबान. राष्ट्रवादी शिवसेना आघाडीचे तुषार प्रकाश जाधव यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. महापालिकेची स्थायी समिती ही आर्थिक कणा समजली जाते. कारण सर्व महत्वाचे आर्थिक निर्णय या समितीमार्फतच घेतले जातात. त्यामुळे या समितीवर सत्ताधारी भाजपा कोणाची वर्णी लावते, याकडे साऱ्यांचे लक्ष लागून होते. पक्षांकडून बऱ्याचदा जुन्या चेहऱ्यांनाच स्थायी समितीवर संधी दिली जाते. मात्र, भाजपाने नव्या चेहऱ्यांवर विश्वास दाखवला आहे. यात योगिता संजय कुटे, कृपेश नाद्रे, विजय देवरे, शीतल वाघ (पाटील), लताबाई सोनार, युवराज चौधरी, चेतन गवळी, निलेश नेमाणे या नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. हे सर्वजण पहिल्यांदाच नगरसेवक बनले आहेत. भाजपा योगिता संजय कुटे, कृपेश लक्ष्मण नांद्रे, विजय अरुण देवरे, शितल राहुल बाघ (पाटील), अमोल पावबा मासुळे, लताबाई यशवंत सोनार (पोतदार), युवराज लक्ष्मण चौधरी, वंदना संजय भामरे, चेतन संजय गवळी, निलेश चंद्रकांत नेमाणे, विक्रम फकीरा थोरात, शिवसेना आघाडी-इरफान अहेमद फजलू रहेमान, शाहनाज बी गुलाम खाटीक, धिरज जवाहरलाल कलंत्री, अन्सारी हलिमा बानो मोहम्मद शाबान, आमीर असलम पठाण या सदस्यांची निवड झाली. महिला व बालकल्याण समिती भाजपा शोभा संजय मिल, मिनल आकाश परदेशी, (माळी), वैभवी अमित दुसाणे, प्रियंका खंडू बोरसे, उज्वला अनिल ठाकरे, प्रतिभा अनिल पाटील, संध्या सागर कदम, राष्ट्रवादी शिवसेना आघाडी परवीनबानो शेख रफिक, मंगला सुनिल सोनवणे, एमआयएम हसीनाबानो साजिद अली अन्सारी, अमोराबानो सऊदुल हसन यांची निवड झाली.

### आंदोलकांना पोलिसांनी प्रवेशद्वारावर अडवले

मायादेवी परदेशी महापौर झाल्यानंतर घेण्यात आलेल्या पहिल्याच महासभेत आंदोलकांनी घुसण्याचा प्रयत्न केला. परंतु, प्रवेशद्वारावर पोलिसांनी आंदोलकांना अडवले. शहरातील प्रभाग क्र.१९ मधील नागरी सुविधा सोडविण्यात याव्यात, यासाठी आझाद हिंद संघटनेतर्फे आंदोलन करण्यात आले. या आंदोलकांनी सभागृहात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. परंतु, प्रशासनाच्या सतर्कतेमुळे आंदोलकांना थांबविण्यात आले.

### संकल्प ग्रुपतर्फे शिबिरात १२१ दात्यांचे रक्तदान

प्रतिनिधी । शहादा

येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या ग्रुपतर्फे श्रीराम नवमीनिमित्त शहादा पालिकेसमोर असलेल्या चौकात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १२५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सर्व संकल्प ग्रुपच्या सदस्यांच्या मातोश्रींच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शहरातील सेवाभावी संस्था संकल्प विविध संघटनांचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते युवक वर्ग व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. श्रीराम नवमीनिमित्त दरवर्षी सकल्प ग्रुप, शहादा ११ पालिका प्रशासनाने त्यांना सहकार्य केले.

# शहादा परिसरासाठी दिली रुग्णवाहिका भेट; आ.रघुवंशी यांची आश्वासनपूर्ती

प्रतिनिधी । शहादा



शहादा शहर व तालुक्यातील रुग्णांच्या सेवेसाठी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख आ.चंद्रकांत रघुवंशी यांच्याकडून रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. या रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले.

शहादा शहर व तालुक्याचा वाढता विस्तार पाहता परिसरातील सर्वसामान्य रुग्णांसह आदिवासी समाजाच्या रुग्णांना वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याने विविध अडचणींना सामोरे जावे लागत होते. सेनेचे संपर्कप्रमुख चंद्रकांत रघुवंशी यांची विधान परिषदेच्या आमदारपदी निवड झाल्यानंतर त्यांनी शहादा येथील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांना दिलेल्या आश्वासनानुसार कायम स्वरूपी रुग्णवाहिका उपलब्ध करून देत आश्वासनाची पूर्ती केली आहे. नुकतीच या रुग्णवाहिकेची शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत लोकार्पण करण्यात आले. शिवसेनेचे शहादा तालुकाप्रमुख मनलेश जयस्वाल ज्येष्ठ शिवसैनिक सुपडू खेडकर, राजरत्न बिरारी, गणेश माळी, हेमंत सूर्यवंशी, धनराज जयस्वाल, लखीचंद जयस्वाल यांच्या उपस्थितीत नंदुरबार येथे आ. चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते रुग्णवाहिका सुपूर्द करण्यात आली. यावेळी नंदुरबार जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष वकील पाटील, हस्ती बँकेचे अध्यक्ष ईश्वर जैन, पालिकेचे बांधकाम सभापती देवेंद्र जैन, अनिल पाटील, रोहिदास राठोड दुर्गेश वैष्णव उपस्थित होते.

### सुकवड गाव अखेर सीसीटीव्हीच्या निगराणीत

प्रतिनिधी । धुळे

तालुक्यातील सुकवड प्र. डांगरी येथे ग्रामपंचायतीने प्रत्येक चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविली आहेत. या कॅमेरांचा प्रारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कॅमेरांमुळे संपुर्ण सुकवड सीसीटीव्हीच्या निगराणीत आल्याने ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे. सुकवड येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रा. धीरज दिलीप साळुंखे यांनी सुचविले होते. दुर्योधन पाटील यांनी अनुमोदन दिले होते. त्यानुसार कॅमेरांचा ठराव ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी मंजुर केला. यावेळी सरपंचखंडू दामू पाटील, ग्रामपंचायत सदस्य विनोद सोनवणे, काशिनाथ पाटील, रवींद्र पाटील, विश्वास साळुंखे, शिवाजी साळुंखे, संग्राम साळुंखे, सुनील साळुंखे, निलेश पाटील, भटू पाटील, अरुण पाटील, कल्पेश रवींद्र पाटील, राजेंद्र शालिग्राम पाटील, प्रवीण बाजीराव पाटील, ज्ञानेश्वर गोविंदा पाटील, दिनकर शालिग्राम पाटील आदी उपस्थित होते.

## पान १ वरुन

**नाशिक जिल्हा परिषदेचा......**

लाख रुपयांचे काम निविदा प्रक्रियेतून ७२ लाख ८९ हजार रुपयांत घेतले होते. या कामाचे ४१ लाख रुपयांचे देयक तक्रारदाराला टप्प्याटप्प्याने मिळाले आहे. सध्याच्या टप्प्यानुसार १० लाखांचे देयक येणे बाकी होते. हे देयक मंजूर करण्यासाठी उपविभागीय अभियंता विठ्ठल पठाडे याने ३ लाख, तर शाखा अभियंता कृष्णकांत देवरे याने २ लाख ६७ हजार रुपयांची, अशी एकूण ५ लाख ६७ हजार रुपयांची लाचेची मागणी केली होती. तक्रार प्राप्त झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली. तेव्हा पंचांसमक्ष पठाडे याने देयकांच्या मोबदल्यात 'बक्षीस' म्हणून ३ लाख रुपये, तर देवरे याने त्याच्या राहत्या घरी २ लाख ६७ हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. जिल्हा परिषदेत ३ लाख रुपये स्वीकारताना विठ्ठल पठाडेला एसीबीच्या पथकाने रंगेहात पकडले. या कारवाईची कुणकुण लागताच शाखा अभियंता कृष्णकांत देवरे पसार झाला. या दोन्ही अभियंत्यांविरुद्ध भद्रकाली पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पाकिस्तानात अज्ञात हल्लेखोरांनी......**

वेस्टर्न बायपासवर सुई सदर्न गॅस कंपनीच्या गॅस पाइपलाइनमध्ये एक मोठा स्फोट झाला. हल्लेखोरांनी पाइपलाइनखाली स्फोटके पेरून ती उडवून दिली. स्फोट इतका शक्तिशाली होता की त्याच्या ज्वाला दूरवरूनही दिसत होत्या. यामुळे एका व्हॉल्व्ह असेंब्लीचे नुकसान झाले. परिणामी, हझारा टाऊन, हझारगंजी, खरोटाबाद आणि मस्तंग, कलात, पिशिन, कुचलक, झियारत यांसारख्या जिल्ह्यांसह क्वेटाच्या अनेक भागांमधील गॅस पुरवठा विस्कळीत झाला.

**देशात आजपासून......**

शहरे, ४,५८० जनगणना शहरे आणि ६ लाख ३९ हजार ९०२ गावांचा समावेश असेल. दुसऱ्या टप्प्याचे यावर असेल लक्ष? - जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात स्थलांतर आणि प्रजनन दरांसह लोकसंख्या शास्त्रीय, सामाजिक-सांस्कृतिक आणि आर्थिक मापदंडांवर माहिती मिळते. मृत्युंजय कुमार म्हणाले, 'जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जात जनगणना केली जाईल'. जनगणना हा केंद्रशासित प्रदेशाचा विषय असून भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीमध्ये तो ६९ व्या क्रमांकावर सूचीबद्ध आहे. गेल्या वर्षी १६ जून रोजी, केंद्र सरकारने २०२७ ची जनगणना घेण्याचा आपला इरादा जाहीर करणारी एक अधिसूचना जारी केली. गृह मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या भारताच्या रजिस्ट्रार जनरलच्या कार्यालयाने जारी केलेल्या या अधिसूचनेत, देशाच्या बहुतांश भागांसाठी जनगणनेची संदर्भ तारीख १ मार्च, २०२७ अशी निश्चित करण्यात आली आहे. मात्र, लडाख आणि जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश व उत्तराखंडच्या काही भागांसह बर्फाच्छादित प्रदेशांसाठी ही तारीख १ ऑक्टोबर, २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे असे म्हटले गेले आहे.

**माजी खा.उन्मेश पाटलांची......**

दरम्यान, शिंदे गटातील प्रवेशावेळी उन्मेश पाटील पुन्हा जळगावचे खासदार होतील, असे मोठे विधान पक्षनेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. त्यांच्या त्या वक्तव्यामुळे जळगावमधील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. नव्या चर्चांनाही उधाण आले. कारण, सध्या जळगावच्या खासदार स्मिता वाघ आणि रावेरच्या खासदार केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे आहेत. विशेष म्हणजे दोघी जणी भाजपकडून निवडून आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, माजी खासदार पाटील यांना शिंदे गटाकडून भविष्यात मोठी जबाबदारी देण्यात येईल, असे भाकीत वर्तवले जात होते. प्रत्यक्षात, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या आदेशावरुन त्यांच्याकडे आता धाराशिव लोकसभा मतदारसंघाच्या संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आपसूकच माजी खासदार पाटील हे शिंदे गटातील दिग्गजांच्या पंगतीत जाऊन बसले आहेत.

**वैभव सूर्यवंशीने १५......**

धावांवर सर्वबाद केलं. वैभव सूर्यवंशीने अवघ्या १७ चेंडूत ५१ धावांची तुफानी खेळी केली, ज्यात ४ चौकार आणि ५ षटकारांचा समावेश होता. त्याने केवळ १५ चेंडूत अर्धशतक पूर्ण करत राजस्थान रॉयल्ससाठी आयपीएल इतिहासातील दुसरं सर्वात जलद अर्धशतक नोंदवलं. याआधी त्याने आयपीएल २०२५ मध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध १७ चेंडूत अर्धशतक झळकावलं होतं. त्यामुळे १८ चेंडूंपेक्षा कमी चेंडूत एकापेक्षा जास्त अर्धशतक करणारा तो या फ्रँचायझीसाठी इतिहासातील पहिला खेळाडू ठरला.

### बीएलओंकडून मतदार यादीची जुळवणीबाबत विशेष मोहीम

प्रतिनिधी । धुळे

शिरपूर विधानसभा मतदारसंघात मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची पूर्वतयारी सुरू असून, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी ऐन उन्हात घरोघरी जाऊन प्रत्येक मतदाराच्या नावाची (सन २००२) मतदार यादीशी जुळवणी करीत आहेत. तसेच, मतदार यादीतील अस्पष्ट छायाचित्रे, चुकीचे तपशील याची दुरुस्ती करीत आहेत. मतदार यादीचा सखोल पुनरीक्षण कार्यक्रम सुरू होणार असून, त्याची पूर्वतयारी म्हणून सध्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्येक मतदाराच्या नावाची २००२ च्या यादीशी जुळवणी करीत आहेत. निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमानुसार २०२४ च्या मतदार यादीतील नावांचे २००२ च्या यादिशी मॅपिंग केले जात आहे. हे काम उपविभागीय अधिकारी शिरपूर शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी यांच्या मार्गदर्शनाखाली युद्धपातळीवर केले जात आहे.

# मनपा आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मुलीने घेतली एचपीव्ही लस ; नागरिकांसाठी प्रेरणादायी आदर्श!

प्रतिनिधी । धुळे

**प्रा. आ. केंद्र, नंदिरोड अंतर्गत कार्यरत एएनएम कोमल बांगर यांच्या मुलगी कु. देवयानी हिने एचपीव्ही लस घेऊन समाजासमोर सकारात्मक व प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले. सदर लसीकरण कमलाबाई कन्या शाळा अंतर्गत पार पडले.**




धुळे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा उद्देश मुलींना गर्भाशयाच्या कर्करोगापासून संरक्षण देणे हा असून, या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या कुटुंबातील मुलींना लस देऊन नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचा आदर्श पुढाकार घेतला आहे. कु. देवयानी हिने एचपीव्ही लस घेऊन पहिले आपण - मग समाज हा संदेश देत इतर पालक व विद्यार्थिनींना लसीकरणासाठी प्रोत्साहन दिले आहे. आरोग्य विभागाच्या वतीने शाळांमध्ये जनजागृती व समुपदेशन केले जात असून मुलींच्या सुरक्षित व निरोगी भविष्यासाठी हा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. महानगरपालिका आरोग्य केंद्रात भेट देऊन एचपीव्ही लसीकरण करून घ्यावे,असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले.

# राजपूत गौरव सन्मान पुरस्काराने जितेंद्रसिंग राजपूतचा गौरव

प्रतिनिधी । नंदुरबार

**पत्रकारिता आणि सामाजिक कार्यातील योगदानामुळे नंदुरबार येथील ज्येष्ठ पत्रकार जितेंद्रसिंग राजपूत यांना राजपूत गौरव सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**



राजपूत गौरव सन्मान पुरस्कारासाठी विविध कार्यात अग्रेसर देशभरातील विविध मान्यवरांची निवड करण्यात आली. आ.चरणसिंह ठाकूर यांच्या हस्ते जितेंद्रसिंग राजपूत यांना राजपूत गौरव पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. या शानदार कार्यक्रमाला विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागपूर येथे टुली इंटरनॅशनल हॉटेल मध्ये पार पडलेल्या एका शानदार समारंभात जितेंद्रसिंग राजपूत यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्ष असलेल्या श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान करोडी नागपूर व अखिल भारतीय क्षत्रिय राजपूत समाज नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने राजपूत गौरव सन्मानाचे आयोजन करण्यात आले होते.

अखिल भारतीय क्षत्रिय राजपूत समाजाचे राष्ट्रीय महामंत्री पंकजसिंह ठाकूर यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राजपूत समाजासह सामाजिक व विविध कार्यात केलेल्या योगदानाबद्दल राष्ट्रीय पातळीवरील हा पुरस्कार देण्यात येतो. प्रारंभी प्रभू श्रीराम आणि वीरशिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंदुरबार येथील ज्येष्ठ पत्रकार जितेंद्रसिंग राजपूत यांच्या सुमारे ३० वर्षांपेक्षा जास्त काळ करीत असलेल्या पत्रकारितेतील आणि राजपूत समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला अतिरिक्त पोलीस कमिशनर नवीनचंद्र रेड्डी, आमदार चरणसिंह ठाकूर, नगरसेवक श्रीकांत आगवाले, युकेश चौहान, करोड़ीचे सचिव दत्तुराव समरित्कर, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण लिहंकर आदि उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# हतनूर धरणातील जलसाठा ७ टक्क्यांनी घटला

## उन्हाळ्यात पाण्याचा वाढला वापर; जळगावकरांनो पाणी जपून वापरा!

प्रतिनिधी । जळगाव

**गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा वाढत आहे. परिणामी जळगाव जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेल्या हातनूर धरणातील पाण्याचे यंदा बाष्पीभवन होऊन पाणी पातळी घटत आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा धरणातील पाणीसाठ्यात तब्बल ७ टक्क्यांची घट झाली आहे. सुर्याच्या वाढत्या प्रखरतेमुळे यंदा हातनूर धरणामधील पाणी ४२.६० दलघमी पाणीसाठा कमी झाला आहे. गतवर्षी ३१ मार्च २०२५ रोजी हातनूरमध्ये ६०.५९ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. मात्र, आज म्हणजेच ३१ मार्च रोजी हा साठा ५३.९२ टक्क्यांवर येऊन ठेपला आहे. म्हणजेच तुलनेत सुमारे ६.६७ टक्क्यांनी साठा घटला आहे. जिवंत जलसाठ्यातही १७ दलघमीची मोठी तूट निर्माण झाली आहे.**



**बाष्पीभवनाचा बसला फटका**

यावर्षी जलसाठा कमी असण्यामागे केवळ पाणी वापर कारणीभूत नसून निसर्गाचा कोपही कारणीभूत आहे. जलवर्षाच्या (१ जुलै ते ३१ मार्च) आकडेवारीनुसार: सन २०२४-२५ मध्ये बाष्पीभवन: ४०.६५ दलघमी, तर सन २०२५-२६ मध्ये बाष्पीभवन: ४२.६० दलघमी. म्हणजेच गेल्या वर्षाच्या तुलनेत जवळपास २ दलघमी अतिरिक्त पाणी केवळ बाष्पीभवनामुळे कमी झाले आहे. उष्णतेची लाट आणि कोरड्या हवामानामुळे धरणातील पाणी मोठ्या प्रमाणात वाफेच्या स्वरूपात उडून जात असल्याने प्रशासनापुढील आव्हाने वाढली आहेत.

एकिकडे पाणीपातळी २१२.१५० मीटरवरून २११.७९० मीटरवर आली आहे, तर दुसरीकडे दिवसाला सरासरी ८.१ दलघमी पाणी बाष्पीभवनाद्वारे कमी होत आहे. जर बाष्पीभवनाचा हाच वेग कायम राहिला, तर मे आणि जून महिन्यात हातनूरचा तळ गाठला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सिंचनासाठी आणि पिण्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे नियोजन आतापासूनच कडक करावे लागणार आहे, अन्यथा जळगावकरांना भीषण टंचाईचा सामना करावा लागू शकतो.

### दृष्टीक्षेपात हातनूरची स्थिती

- पाणी पातळी २१२.१५० मी
- जलसाठा २८७.५० द.ल.घ.मी.
- जिवंत जलसाठा १५४.५० द.ल.घ.मी.
- टक्केवारी ६०.५९%
- बाष्पीभवन ८.७ द.ल.घ.मी.

# गावठी कट्टा विक्रीप्रकरणी दोन जणांना अटक

प्रतिनिधी । जळगाव

**गावठी कट्टा विक्रीसाठी आलेल्या दोन इसमांना एमआयडीसी पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. ही कारवाई ३० मार्च रोजी करण्यात आली असून, आरोपींकडून कट्टा, जिवंत काडतुसे, मोटारसायकल व मोबाईल असा एकूण १ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

शहरातील एमआयडीसी पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहिती अशी की, जळगाव शहरातील छत्रपती संभाजीनगर रोड परिसरात काही इसम गावठी कट्टा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचण्यात आला. संशयित इसमांना ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्यांच्या जवळ गावठी कट्टा व काडतुसे आढळून आली.

पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून मोटारसायकल, जिवंत काडतुसे, एक देशी बनावटीचा कट्टा आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईत एकूण १,३३,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींकडून आणखी माहिती घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने केली.

## थोडक्यात

### ५१ मुले वाचणार आज हनुमान चालिसा

**भुसावळ** । येथील यावल रोडवरील बंडू वडापाव सेंटर समोरील, जागृत प्राचीन सूर्यमुखी श्री हनुमान मंदिरामध्ये श्री हनुमान जयंतीनिमित्त पूर्वसंध्येला बुधवार, दि.१ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता ५१ मुले हनुमान चालीसा वाचणार आहेत. याकरिता मुलांनी नाव नोंदणी मंदिर आयोजकांकडे करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमासाठी मुलांनी मंदिरात येताना हनुमान चालीसा पुस्तक घेऊन येणे. प्रत्येक मुलाला सर्टिफिकेट दिले जाईल. याकरिता त्वरित नाव नोंदवावे तसेच पुढील आयोजित कार्यक्रमामध्ये सर्टिफिकेटचे वाटप करण्यात येणार आहे.

### यावलच्या जे.टी. महाजन स्कूलमध्ये बक्षीस वितरण

**यावल** । व्यास शिक्षण मंडळ संचलित जे.टी. महाजन स्कूल यावल येथे दि. ३० मार्च रोजी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्कूलच्या प्राचार्या रंजना महाजन यांनी स्वीकारले. वार्षिक पारितोषिक वितरण या समारंभामध्ये वर्षभरामध्ये घेतले गेलेल्या स्पोर्ट, विज्ञान प्रदर्शन, चर्चासत्र, स्पर्धेमधील विजेत्यांना ट्रॉफी सर्टिफिकेट आणि भेटवस्तू देऊन त्यांचा कलागुणांचा गौरव करण्यात आला . रंजना महाजन मॅडम यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस प्रोत्साहन दिले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरोज येवले मॅडम यांनी केले. तसेच या कार्यक्रम ात इंग्लिश मिडीयम च्या प्राचार्या दिपाली धांडे मॅडम उपस्थित होत्या. शाळेच्या पर्यवेक्षिका राजश्री लोखंडे मॅडम गौरी भिरूड मॅडम यादेखील उपस्थित होत्या. ते सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थिती होते. हा कार्यक्रम उत्साह साजरा करण्यात आला.

# विशाखा यांच्या स्वरोत्सवास रसिकांची उत्स्फूर्त दाद

प्रतिनिधी । जळगाव

**येथील गायिका विशाखा पोतदार यांनी सादर केलेल्या स्वरोत्सव या शास्त्रीय आणि सुगम संगीत मैफिलीला रसिकांची उत्स्फूर्त दाद लाभली.**



मायादेवी नगरातील रोटरी भवनच्या सभागृहात आयोजित मैफिलीचा शुभारंभ उद्योजक प्रेम कोगटा, संगीततज्ञ राजेश पुराणिक, किरण पातोंडेकर, उदय पोतदार यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. विशाखा पोतदार यांनी राग सारंग आणि रागमाला सादर करीत मैफिलीला सुरुवात केली. त्यांनी झनक झनक पायल बाजे ही बंदिश आणि आज जाने की जिद ना करो ही गझल सादर केली. गायक कपिल शिंगाणे यांनी नारायणा रमा रमणा हे गीत आणि बरसने लागे सावन ही ठुमरी सादर केली. अमृताहुनी गोड नाम तुझे देवा हे भक्तीगीत आणि हे चांदणे फुलांनी शिंपीत रात्र आली व लबपर आये गीत सुहाने या विशाखा पोतदार यांनी सादर केलेल्या गीतांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले. विशाखा पोतदार व कपिल शिंगाणे यांनी भैरवी सादर करीत मैफिलीचा समारोप केला.

### तामसवाडी परिसरात वादळी पावसाचा तडाखा

प्रतिनिधी । पारोळा

तालुक्यासतील टोळी, तरडी, तामसवाडी, येथे आज दि.३० मार्च रोजी संध्याकाळी ५.१५ वाजता पावसाला सुरुवात झाली असुन जवळ जवळ ३० मिनिट वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणात पाऊस व गारा पडल्या आहे शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात ज्वारी बाजरी मका व इतर सर्व पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तरी सरसकट पंचनामे व्हावे.

### महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जळगाव शहर शाखेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

# भोंदू खरातच्या चौकशीसाठी विशेष तपास पथकाची नियुक्ती करावी

प्रतिनिधी । जळगाव

**नाशिक येथील भोंदू अशोक खरात याने अध्यात्म आणि ज्योतिषशास्त्राच्या नावाखाली महिलांचे केलेले शोषण हे केवळ एक गुन्हेगारी प्रकरण नसून सत्ता, संपत्ती आणि लैंगिक शोषणाचे गंभीर उदाहरण आहे. या प्रकरणाची व्याप्ती मोठी असून त्याची निष्पक्ष चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथकाची नियुक्ती करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) जळगाव शहर शाखेने मुख्यमंत्री महोदयांकडे जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून निवेदनाद्वारे केली आहे.**



या निवेदनात अंनिसने खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील बुवाबाजी आणि महिलांच्या शोषणाविरुद्ध कठोर पावले उचलण्याचे आवाहन केले आहे. समितीने सरकारसमोर प्रामुख्याने मागण्या मांडल्या आहेत. खरात प्रकरणाची चौकशी कोणत्याही राजकीय किंवा प्रशासकीय दबावाशिवाय मार्फत करण्यात यावी आणि यामागील संपूर्ण रॅकेटचा शोध घ्यावा. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा, २०१३ ची कठोर अंमलबजावणी करावी आणि रखडलेली नियमावली तातडीने पूर्ण करावी. अशोक खरातने अंकशास्त्र आणि हस्तरेषाशास्त्राचा वापर करून लोकांची फसवणूक केली आहे. त्यामुळे जादूटोणाविरोधी कायद्यात फलज्योतिषाचाही समावेश करून त्यावर कायदेशीर नियंत्रण आणावे. या प्रकरणातील पीडित महिलांची ओळख गोपनीय ठेवून त्यांना कायदेशीर मदत, मानसोपचार आणि आवश्यक सुरक्षा पुरवण्यात यावी, अशी भूमिका समितीने घेतली आहे. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. यावेळी अंनिसचे मानसिक आरोग्य व्यवस्थापन विभागाचे राज्य सहकार्यवाह विश्वजित चौधरी, शहर कार्याध्यक्ष मीनाक्षी चौधरी, राहुल बैसाणे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### दिव्यांग बोर्डाचे कामकाज सोमवार ते शुक्रवार सुरू राहणार

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आता झिरो पेंडन्सी कारभार

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींची गैरसोय टाळण्यासाठी आणि प्रमाणपत्रांचे प्रलंबित काम मार्गी लावण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता दिव्यांग बोर्डाचे कामकाज केवळ बुधवारीच नव्हे, तर आठवड्यातील सोमवार ते शुक्रवार या पाचही दिवशी सुरू राहणार आहे.**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथील दिव्यांग मंडळात दर बुधवारी विशेष तपासणी केली जाते.

मात्र, वाढती गर्दी आणि प्रलंबित प्रकरणे लक्षात घेता, अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांनी हे बोर्ड सोमवार ते शुक्रवार या कालावधीत सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत. वरिष्ठांकडून आलेल्या सूचनांनुसार, दिव्यांग बोर्डाच्या कामात झिरो पेंडन्सी (शून्य प्रलंबित कामे) आणणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. ज्या दिव्यांग व्यक्तींना कुपन देऊन अपॉइंटमेंट देण्यात आली आहे, त्यांना त्यांच्या मोबाईलवर संदेश पाठवला जाईल. संदेशामध्ये नमूद केलेल्या ठराविक तारखेलाच संबंधित व्यक्तीने तपासणीसाठी हजर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे रुग्णालयातील अनावश्यक गर्दी टाळता येईल आणि लाभार्थ्यांची तपासणी वेळेत होणे सोयीचे होईल.

दिव्यांग बांधवांची गैरसोय टाळण्यासाठी हा विस्तार करण्यात आला आहे. लाभार्थ्यांनी त्यांना मिळालेल्या संदेशातील तारखेनुसारच उपस्थित राहावे, जेणेकरून प्रशासनाला अधिक गतीने सेवा देता येईल, असे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर व दिव्यांग बोर्ड अध्यक्ष डॉ. मारोती पोटे यांनी सांगितले.

### लाभार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

**कागदपत्रे :** कुपनच्या मागील बाजूस दर्शवलेली सर्व आवश्यक मूळ कागदपत्रे आणि त्यांच्या छायांकित प्रती सोबत आणणे अनिवार्य आहे.उपस्थिती: तपासणीसाठी लाभार्थ्यांनी स्वतः उपस्थित राहणे आवश्यक आहे. वेळ: सोमवार ते शुक्रवार या काळात दिव्यांग मंडळ विभागात उपस्थित राहावे.

# महिला मंडळातर्फे ५ एप्रिल रोजी रंगणार खेळ पैठणीचा

प्रतिनिधी । जळगाव

**श्री क्षत्रिय अहिर शिंपी समाज हितवर्धक संस्था संचलित महिला मंडळयांच्या वतीने महिला जागर भव्य मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून येत्या ५ एप्रिल रोजी महिलांसाठी विशेष आकर्षण असलेला खेळ पैठणीचा आणि होम मिनिस्टर या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रसिद्ध झालेले सूत्रसंचालक ललित खैरनार सटाणा हे उपस्थित राहणार असुन स्पर्धांचा थरार रंगणार आहे.**

दैनंदिन, कौटुंबिक, जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या महिलांना विरंगुळा मिळावा आणि त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, या उदात्त हेतूने संस्थेच्या महिला मंडळ च्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून खेळ पैठणीचा या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या होम मिनिस्टर स्पर्धा: टीव्हीवरील लोकप्रिय कार्यक्रमाच्या धर्तीवर या स्पर्धेत मनोरंजक खेळ आणि प्रश्नांची रेलचेल असेल. सरप्राईज गेम्स महिलांसाठी काही खास आणि अनपेक्षित खेळ खेळले जातील, ज्यामध्ये जागेवरच आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी राहणार आहे. उपस्थितीचे आवाहन महिला मंडळाचे अध्यक्षा माधुरी शिंपी, गीता जगताप, अनिता शिंपी व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केले आहे

# दिव्यांग कल्याण योजनांचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा दिव्यांग समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी तथा समिती अध्यक्ष रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकीत दिव्यांग कल्याणाशी संबंधित विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.**

या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. स्वप्निल सांगोळे, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण योगेश पाटील, नगरपालिका सहआयुक्त जनार्दन पवार, दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पद्मनाभ म्हस्के तसेच संबंधित विविध दिव्यांग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### कर्णबधीर विद्यार्थ्यांना कर्णयंत्रांचे वितरण

यावेळी जि.प. सेस २०२५-२६ अंतर्गत दिव्यांग कल्याण विभागामाफ'त राबविण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील नोंदणीकृत व मान्यताप्राप्त कर्णबधीर विद्यालयांमधील ३४६ विद्यार्थ्यांना एकूण ६९२ कर्णयंत्रांचे वितरण करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली. या उपक्रमासाठी सुमारे ५३ लाख रुपये खर्च करण्यात आला असून जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात पाच कर्णबधीर विद्यार्थ्यांना कर्णयंत्रांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या श्रवण क्षमतेत वाढ होऊन त्यांच्या शिक्षणात व दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडण्यास मदत करणे हा आहे. बैठकीत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रच्या कार्यप्रणालीचा तसेच उद्भवणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यात आला. याशिवाय यूडीआयडी कार्ड वितरणाची सद्यस्थिती, प्रलंबित अर्ज व त्याच्या गतीकरणासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या यूडीआयडी प्रमाणपत्र पडताळणीची स्थितीही तपासण्यात आली. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकडील दिव्यांगांसाठी राखीव ५ टक्के निधीच्या खर्चाचा आढावा, जिल्हा नियोजन समिती अंतर्गत १ टक्के निधी व विविध विकासकामांची माहिती बैठकीत देण्यात आली. मर्यादित व कायदेशीर पालकत्व प्रकरणे, शासकीय इमारतींमध्ये सुगम्यता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तसेच संजय गांधी निराधार योजनेच्या अंमलबजावणीबाबतही चर्चा करण्यात आली.

# प्रेस फोटोग्राफर संघ ठरला पत्रकार प्रीमियर लीग पर्व-२ चा विजेता!

## जळगाव प्रिंट मिडिया संघ उपविजेता तर प्रेस एडिटर संघ तृतीय, मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण

प्रतिनिधी । जळगाव

**पत्रकारांनी पत्रकारांसाठी आयोजित केलेली महाराष्ट्रातील एकमेव स्पर्धा पत्रकार प्रिमियर लीग पर्व-२ चा समारोप दि.२९ मार्च रोजी दिमाखात पार पडला. जळगाव प्रिंट मीडियाविरुद्ध जळगाव प्रेस फोटोग्राफर संघात खेळल्या गेलेल्या उपांत्य सामन्यात प्रेस फोटोग्राफर संघाने बाजी मारली. तृतीय क्रमांक प्रेस एडिटर संघाने पटकावला. सर्व संघांना आणि खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.**





समाजाचा चौथा आधारस्तंभ असलेले पत्रकार नेहमीच जीवाची बाजी लावत, ऊन, वारा, पाऊस, थंडी सहन करीत दिवसरात्र धावपळ करीत असतात. राज्यात विविध धर्म, जात, शासकीय, निम शासकीय कार्यालयातर्फे क्रिकेटसह इतर स्पर्धा आयोजित केल्या जातात. सर्वच आपआपला विचार करतात मात्र पत्रकारांचा कुणीही विचार करत नाही. पत्रकारांच्या आरोग्य, मनोरंजनासाठी हाती घेतलेल्या पत्रकार प्रीमियर लीगचे दुसरे पर्व दि.२६ ते २९ मार्च दरम्यान सागर पार्क मैदान याठिकाणी पार पडले.

**२४ संघांचा सहभाग, चुरशीचे सामने**

जिल्हाभरातील पत्रकारांना एकत्र करून, सर्व पत्रकार संघटनेच्या पाठींब्याने खेळल्या गेलेल्या स्पर्धेत जिल्ह्यातील पत्रकारांचे तालुकानिहाय १४, जळगाव शहरातील संघ, संपादक, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, डॉक्टर, पोलीस प्रशासन संघ असे २४ संघ सहभागी झाले होते. चार दिवसात अनेक चुरशीचे सामने पहावयास मिळाले. ६ षटकांच्या सामन्यात ९९ सर्वोच्च धावसंख्या तर २० सर्वात कमी धावसंख्या देखील प्रेक्षकांनी अनुभवली.

खेळाडू, प्रेक्षक, कुटुंबासाठी उत्तम व्यवस्था

चार दिवसीय स्पर्धेत जवळपास ५०० पेक्षा अधिक पत्रकारांनी सहभाग नोंदवला. खेळाडू पत्रकारांसाठी चार दिवस जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. तसेच खेळाडू, कुटुंबीय आणि प्रेक्षकांसाठी सरबत, पाणी आणि लाईव्ह प्रक्षेपणाची देखील व्यवस्था आयोजकांनी केली होती. स्पर्धेसाठी किशोर पाटील, वाल्मिक जोशी, प्रवीण सपकाळे, चेतन वाणी, जकी अहमद, भगवान सोनार, वसीम खान, सचिन गोसावी, राकेश वाणी, यामिनी कुलकर्णी व पत्रकार मित्रांनी परिश्रम घेतले. चार दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील, मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते करण्यात आले. या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, मंत्री गिरीश महाजन, खासदार स्मिता वाघ, आ.राजुमामा भोळे, आ.किशोर पाटील, महापौर दीपमाला काळे आणि जेष्ठ पत्रकारांनी हजेरी लावली.

# भाजपा शहराध्यक्षांनी दिला कुलूप ठोकण्याचा इशारा

## फत्तेपूर ग्रामपंचायतीच्या भूमिकेकडे गावकऱ्यांचे लक्ष

प्रतिनिधी । फत्तेपूर, ता. जामनेर

**फत्तेपूर ग्रामपंचायतीने अनेक दिवसांपासून बंद असलेला थंड व फिल्टर पाण्याचा प्लांट १०/१२ दिवसांपूर्वीच सुरु करून सुटकेचा नि:श्वास सोडला होता. मात्र फिल्टर प्लांटची समस्या काही केल्या ग्रामपंचायतीचा पिछा सोडायला तयार नाही.**



**रात्र-दिवस सुरू असणाऱ्या प्लांटकडे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी फिरूनही पाहिले नाही. त्यामुळे फिल्टर प्लांटमधील पाणी थंड करणारा चिलर नादुरुस्त झालेला आहे. त्यामुळे गावकऱ्यांना थंड पाणी मिळणे बंद झाले आहे. याबाबतची तक्रार भाजपा शहराध्यक्ष रमेश चौधरी यांनी एका गृपच्या माध्यमातून केली होती.**

ग्रामपंचायतीला अगोदरच प्लांट सुरु करणेसाठी तारेवरची कसरत करावी लागली. इकडून तिकडून जागा शोधून फिल्टर प्लांट सुरू केला. तर १०/१२ दिवसांत प्लांटमधील पाणी थंड करणारे चिलर नादुरुस्त झाल्याने प्लांट बंद पडलेला आहे. त्यामुळे व्यापारी वर्ग, दुकानदार, गावकरी, महिला वर्गाला अडचणीचा सामना करावा लागत आहे. प्लांट बंद पडला म्हणून गावकऱ्यांना २० लिटर थंड पाणी मनमानी करणाऱ्या पाणी विक्रेत्यांकडून ३० रुपये घ्यावे लागत आहे. याबाबत भाजपा फत्तेपूर शहराध्यक्षांनी ग्रामपंचायतीविषयी नाराजी व्यक्त करून येणाऱ्या दिवसात ग्रामपंचायतीने फिल्टर प्लांट सुरु न केल्यास प्लांटला कुलूप ठोकण्याचा इशारा एका गृपवर दिलेला आहे. येथील ग्रामपंचायतीवर भाजपाची सत्ता आहे आणि प्लांट सुरू न केल्यास प्लांटला कुलूप ठोकण्याचा इशाराही भाजपाच्या शहराध्यक्षांनी देऊन जणू ग्रामपंचायतीला घरचा अहेर दिल्याचे बोलले जात आहे? आता ग्रामपंचायत काय भूमिका घेते? याकडे गावकऱ्यांच्या नजरा लागलेल्या आहे. 'नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न' या म्हणीप्रमाणे ग्रामपंचायतीला फिल्टर व थंड पाण्याचा प्लांट सुरू करण्यासाठी अनेक वेळा संकटे/विघ्न आलेली आहेत. या विघ्नांतून सावरून ग्रामपंचायतीने प्लांट सुरू केला. ८/१० दिवसांतच सुरू केलेला प्लांट बंद पडल्याने पुन्हा गांवकऱ्यांच्या तक्रारी सुरू झालेल्या आहेत. त्यामुळे पुन्हा ग्रामपंचायत कचट्यास सापडलेली आहे.

# लोहारी येथील जवान अनंतात विलीन

## शासकीय इतमामात अंतिम संस्कार



प्रतिनिधी । पाचोरा

**तालुक्यातील लोहारी येथील जवान सीआयएसएफ केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात देशसेवा बजावत असताना हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. काल त्यांच्यावर शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले.**

लोहारी येथील जवान बापू उखा कोळी यांचे दि.२७ मार्च रोजी पश्चिम बंगाल येथे जलपाईगुडी येथे विधानसभा निवडणुकीच्या बंदोबस्तासाठी जात असताना हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले होते. वीर जवान शहीद बापू कोळी २४ वर्षांपासून देशसेवा बजावत होते. २००२ मध्ये ते भरती झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा, एक मुलगी, बहिण, भाऊ, असा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनाने कुटुंबासह परिसरात व संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

वीर जवान बापू उखा कोळी यांचे पार्थिव पश्चिम बंगाल येथून विमानाने मुंबईला आणण्यात आले होते. तेथून त्यांच्या मुळगाव असलेल्या लोहारी येथे आणण्यात आले. दि.३० मार्च रोजी शासकीय इतमामात त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. ट्रॅक्टरवर फुलांनी सजवलेल्या ट्रॅक्टरवर त्यांचे पार्थिव तिरंग्यात लपेटून त्यांची अंत्ययात्रा रहात्या घरून काढण्यात आली.

अंत्ययात्रेत हजारोंच्या संख्येने गावकरी, शासकीय अधिकारी व नातेवाईक, तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते. शहीद जवान बापू कोळी अमर रहेच्या घोषांनी परिसर दुमदुमला होता. शहिद जवान बापू उखा कोळी यांना मानवंदना देण्यात आली. तसेच जळगांव लोकसभेच्या खासदार स्मिता वाघ यांच्या वतीने भैरवी वाघ पलांडे, माजी आमदार दिलीप वाघ, आमदार किशोरअप्पा पाटील यांच्या वतीने न. पा. गटनेते तथा नगरसेवक सुमित पाटील, भाजपा नेत्या वैशाली सूर्यवंशी, तहसीलदार विजय बनसोडे, पिंपळगाव हरेश्वर पोलीस स्टेशनच्या सपोनि कल्याण वर्मा, जिल्हा सैनिक अधिकारी उगले साहेब, सीआयएसएफचे सहाय्यक उपनिरीक्षक एम.के. पाटील, डी.बी. मोरे, लोहारीच्या सरपंच रंजना पाटील, माजी सभापती सुभाष पाटील, डॉ भरत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

## थोडक्यात

### भाजपा विधानसभा क्षेत्राची संघटनात्मक आढावा बैठक

**मुक्ताईनगर ।** भारतीय जनता पक्षाची विधानसभा क्षेत्राची संघटनात्मक आढावा बैठक जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर यांच्या अध्यक्षतेखाली येथील गोदावरी मंगल कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीत भाजपाचे संघटन मजबुतीसाठी व पक्षकार्य विस्तारासाठी उपस्थित प्रमुख कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीस जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

### श्री हनुमान जयंतीनिमित्त आज हनुमान चालिसा पठण

**भुसावळ ।** येथील यावल रोडवरील जागृत प्राचीन सूर्यमुखी श्री हनुमान मंदिरामध्ये श्री हनुमान जयंतीनिमित्त पूर्वसंध्येला बुधवार, दि.१ एप्रिल रोजी सायंकाळी ६.०० वाजता ५१ मुले हनुमान चालीसा वाचणार आहेत. याकरिता मुलांनी नाव नोंदणी मंदिर आयोजकांकडे करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. मुलांनी मंदिरात येताना हनुमान चालीसा पुस्तक घेऊन येणे. प्रत्येक मुलाला प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

# गावठी दारूची हातभट्टी पोलिसांकडून उद्ध्वस्त

प्रतिनिधी । चाळीसगाव

**चाळीसगाव ग्रामीण पोलिसांनी तालुक्यातील जुनोने शिवारात अवैध गावठी दारू निर्मितीवर धाड टाकून, ती संपूर्ण हातभट्टी उद्धवस्त केली आहे. याप्रकरणी एकाला ताब्यात घेतले असून या कारवाईत मोठ्या प्रमाणात कच्चे रसायन जप्त करण्यात आले.**



जुनोने येथील कुंडाच्या नाल्यात एका शेताजवळ गावठी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी कच्चे रसायन भिजत ठेवण्यात आल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ छापा टाकला. पोलीस उपनिरीक्षक राहुल राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पंचांसह घटनास्थळी कारवाई केली. या वेळी दगडू सदाशिव गायकवाड (वय ५०, रा. जुनोने, ता. चाळीसगाव) याला जागीच पकडण्यात आले. आरोपीच्या ताब्यातून सुमारे ३५० लिटर कच्चे रसायन जप्त करण्यात आले.

या रसायनात गुळ, नवसागर आणि एरंडी यांचे मिश्रण असल्याचे समोर आले आहे. जप्त मालाची किंमत सुमारे १२ हजार २५० रुपये असल्याचे सांगितले जात आहे. पोलिसांनी नमुना म्हणून काही रसायन सीलबंद केले असून उर्वरित साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (फ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# पाचोरा येथे समता सैनिक दलाचे निषेध, धिक्कार मोर्चा काढत प्रांताधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

प्रतिनिधी । पाचोरा



येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसीलदार कार्यालय आवारात वाणेगांव येथील स्मशानभूमीत दलीत वृध्द महिलेच्या अंत्यविधीस विरोध करणाऱ्यांवर अनुसूचित जातीजमाती प्रतिबंधक कायद्यानुसार तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा, यासह विविध आठ मागण्यांसाठी समता सैनिक दल व वाणेगांव येथील रहिवाशांनी आंदोलनास दि.३० मार्च रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ते प्रांताधिकारी कार्यालय असा निषेध व धिक्कार मोर्चा काढण्यात आला व तहसीलदार कार्यालयाच्या आवारात मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन करण्यात येणार आहे. तालुक्यातील वाणेगाव येथे १९ मार्च रोजी चंद्रभागा काशिनाथ सोनवणे या ८५ वर्षीय वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाला होता. त्यांचा अंत्यविधी आमच्या समाजाच्या दफनभूमीत करण्यास गावातील लोकांनी विरोध केला होता व आम्हाला जातीच्या आधारावर अपमानित केले, अशा आशयाची फिर्याद पिंपळगाव हरेश्वर पोलीस स्टेशन येथे मयताचे नातेवाईक करुणा समाधान सोनवणे व इतरांनी दाखल केली होती. संबंधित लोकांवर कारवाई करण्यास विलंब टाळाटाळ होत असल्याने निषेध व धिक्कार मोर्चा काढण्यात आला होता. वाणेगांव येथील दफनभूमीलगत असलेली गावठाण जागा त्वरित दफनभूमीत वर्ग करण्यात यावी. दफनभूमीवरील अतिक्रमण काढण्यात यावे व कंपाऊंड व सुरक्षा भिंत बांधून जागा समाज बांधवांच्या ताब्यात देण्यात यावी, स्थानिक समाज बांधवांना पोलीस संरक्षण देण्यात यावे, वाणेगांव येथील सामाजिक तेढास कारणीभूत असलेल्या व जातीय सलोखा अबाधित ठेवण्यासाठी अकार्यक्षम असलेली ग्रामपंचायत बरखास्त करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशा प्रकारे घटना तालुक्यात व गावात घडू नयेत, यासाठी सामाजिक सलोख्याची उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

# जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची मागणी

## अंधश्रध्दा निर्मूलन समितीतर्फे तहसीलदारांना निवेदन



प्रतिनिधी । चाळीसगाव

**महाराष्ट्रात जादुटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि आपल्या तालुक्यात भोंदूबाबांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अंधश्रध्दा निर्मूलन समिती चाळीसगांव शाखेतर्फे तहसिलदार व पोलिस निरीक्षकांना करण्यात आली आहे.**

यासंबंधीचे निवेदनही दि.३० रोजी तहसीलदार व पोलीस प्रशासनास देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, ज्योतिषी बाबा-बुवा आणि राजकारणी, सरकारी अधिकारी धनदांडग्या प्रभावशाली व्यक्ती यांची साठगाठ किती भयानक शोषणकारी असते, याचे हादरवून टाकणारे चित्र अशोक खरात प्रकरणातून पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या समोर आले आहे. या प्रकरणाचा नि:पक्षपाती तपास होऊन गुन्हेगारांना शासन झालेच पाहिजे, तसेच पुन्हा असे प्रकार घडू नयेत, यासाठी पुढील मुद्यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. त्याचप्रमाणे प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाची स्थापना करण्याचा शासनाचा निर्णय आहे. हे अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष प्रत्यक्ष कार्यान्वित करणे आवश्यक आहे. महिला, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील कार्यकर्त्यांना सदर अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाचे सदस्य म्हणून जोडून घेऊन, त्यांच्या नियमित बैठका झाल्या तर परिसरात चालणारे अघोरी प्रकार वेळीच समोर येतील व त्यांना पायाबंद घालता येईल.

# आदिवासी भागात रानावनात बहरला मोहफुलांचा सुगंध...

## • मोहाच्या अर्क पुजनाने होतात आदिवासीचे धार्मिक विधी



प्रतिनिधी । चोपडा

निसर्गाशी नातं सांगणाऱ्या आदिवासी संस्कृतीमध्ये 'मोह' या वृक्षाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच सातपुड्याच्या दऱ्याखोऱ्यात मोहाचा सुगंध दरवळू लागला असून, आदिवासी बांधवांसाठी हा केवळ वृक्ष नसून त्यांच्या जगण्याचा मुख्य आधार आणि मअक्षय कल्पवृक्षफ ठरत आहे. या वृक्षाचे महत्त्व अधोरेखित करताना बिरसा ब्रिगेडचे जळगाव जिल्हाध्यक्ष रामदास भाईदास पावरा यांनी मोहाच्या संवर्धनासाठी आणि त्याच्या बहुगुणी उपयोगाबाबत समाजाला आवाहन केले आहे.

### जन्म ते मृत्यूपर्यंत मोहाचे अतूट नाते

आदिवासी परंपरेत मोह वृक्षाला देववृक्षाचा दर्जा आहे. मोहफुलाचा अर्क (ज्याला पारंपरिक भाषेत मद्य म्हटले जाते) हा केवळ पेयाचा भाग नसून तो सांस्कृतिक विधींचा आत्मा आहे. जन्माचा सोहळा असो, विवाह कार्य असो किंवा कुटुंबातील एखाद्या सदस्याचा अंत्यविधी; आदिवासी देवतांना मोहाचा अर्क अर्पण केल्याशिवाय कोणताही विधी पूर्ण होत नाही. सण-उत्सव आणि सामाजिक कार्यक्रमांची सुरुवातच या अर्काच्या पूजनाने होते, इतके पवित्र स्थान या वृक्षाला आहे.

### भल्या पहाटेपासून रान होते गजबजलेले

सध्या उन्हाचा पारा वाढत असतानाच मोहाची फुले गळण्यास सुरुवात झाली आहे. पहाटे कोंबड्याच्या आरवने सुरू होताच ४ वाजेपासूनच आदिवासी बांधव आपल्या कुटुंबासह, ज्यात लहान मुले आणि महिलांना सोबत घेऊन टोपल्या-डालकी घेऊन रानाकडे निघतात. अंधार असतानाच झाडाखाली पडलेली फुले वेचण्यासाठी होणारी ही लगबग म्हणजे एक प्रकारे निसर्गाची सेवाच आहे. हे कष्ट केवळ पोटापाण्यासाठी नसून परंपरेचा वारसा जपण्यासाठी देखील आहेत.

### केवळ नशा नव्हे, तर 'आरोग्यदायी' अन्न

मोहाच्या फुलांकडे केवळ दारू बनवण्याचे साधन म्हणून पाहणे चुकीचे आहे. आधुनिक काळात याचे पौष्टिक महत्त्व समोर आले असून त्यापासून विविध खाद्यपदार्थ बनवले जात आहेत. पौष्टिक चिक्की आणि लाडू मुलांच्या आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी. मोहफुलाची खीर व भाजी पारंपरिक चवीसोबतच यात लोहाचे प्रमाण भरपूर असते. मोहाच्या फळापासून (टोळी) काढलेले तेल स्वयंपाकासाठी आणि आयुर्वेदिक उपचारांसाठी वापरले जाते. सध्या मोहफुलापासून जाम, जेली आणि बिस्किटे बनवण्याचे प्रयोगही यशस्वी होत आहेत.त्यासाठी मोहफुलांना योग्य भाव मिळण्यासाठी शासनाने हमीभावाने खरेदी केंद्रे सुरू करावीत व स्थानिक पातळीवर मोहफुलांपासून बिस्किटे, जॅम, आणि औषधी तयार करणारे छोटे प्रक्रिया उद्योग सुरू करण्यासाठी तरुणांना अर्थसाहाय्य द्यावे. यासाठी शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची गरज आहे.



> मोहवृक्ष हा आमच्या संस्कृतीचा मानबिंदू आहे. या झाडापासून मिळणारे उत्पन्न आदिवासी कुटुंबांना आर्थिक स्थैर्य देते. मात्र, केवळ आर्थिक फायदा न पाहता, या वृक्षाचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. समाजातील इतर घटकांनीही मोहाच्या फुलांकडे एक मसुपरफूडफ म्हणून पाहावे आणि या नैसर्गिक संपत्तीचा आदर करावा.
>
> **– रामदास भाईदास पावरा**
> जिल्हाध्यक्ष, बिरसा ब्रिगेड जळगाव

**चोपडा नगरपरिषद चोपडा, जि. जळगाव**

जा.क्र.२०२५-२०२६/भांडार/कार्या. क्र./३१ दि. ३१/०३/२०२६

**द्वितिय मुदतवाढ**

चोपडा नगरपरिषदेस भांडार विभागासाठी सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाकरीता कार्यालयीन नमुने स्टेशनरी साहित्य पुरविणे साठी इकडील जा.क्र. २०२५-२०२६/भांडार / कार्या. क्र./२९ दि. २७/०३ /२०२६ अन्वये जाहीर ई निविदा सूचना दिनांक २८/०३/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर ई निविदेस द्वितीय मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपले दर ऑनलाईन पध्दतीने दि.०२/०४/२०२६ पर्यत दाखल करावे. सदर कामांचा सविस्तर तपशिल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरील ई-निविदा सूचना मध्ये अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

सही/-
मुख्याधिकारी चोपडा
नगरपरिषद, चोपडा.

चोपडा नगरपरिषद चोपडा, जिल्हा जळगांव